# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र.२६८/ २०२३

विषय : संशोधन मार्गदर्शक नियमावलीबाबत...

विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. ७ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या राजपत्रामध्ये मुद्दा क्र. ६ (१) अन्वये संशोधन मार्गदर्शक मान्यतेसंदर्भात खाली नमूद केलेले नियम विहीत केलेले आहेत. या अनुषंगाने विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. ७ नोव्हेंबर, २०२२ च्या अधिसूचनेमधील संशोधन मार्गदर्शक मान्यतेसंदर्भातील तरतुदीनुसार अर्जदार अध्यापक नियमित स्वरूपात ज्या महाविद्यालयात कार्यरत आहे, त्या महाविद्यालयात संबंधित विषय हा पदव्युत्तर पदवी स्तरावर शिकविला जात असेल तरच संबंधित विषयात संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

२. विद्यापीठ अनुदान आयोगाची दि. ७ नोव्हेंबर, २०२२ ची अधिसूचना निर्गमित होण्यापूर्वी ज्या अध्यापकांना, त्यांच्या महाविद्यालयात संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम शिकविला जात नाही, तरीही संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता दिलेली आहे ती, त्यांना नवीन विद्यार्थी न घेण्याच्या अटीवर सुरू ठेवण्यात यावी.

३. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. ७ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या अधिसूचनेनंतर ज्या अध्यापकांना, ते कार्यरत असलेल्या महाविद्यालयांत संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम शिकविला जात नाही, तरीही संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता दिलेली आहे. अशा अध्यापकांनी ते कार्यरत असलेल्या महाविद्यालयात संबंधित विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमास विद्यापीठाने संलग्नीकरण दिल्याचा पुरावा सादर केल्यानंतरच त्यांना पीएच्.डी.चे विद्यार्थी घेण्यास मुभा देण्यात यावी.

४. संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता दिलेल्या अध्यापकांची संस्थेंतर्गत इतर महाविद्यालयात बदली किंवा इतर महाविद्यालयात नव्याने नियुक्ती झाल्यास व अशा महाविद्यालयात संबंधित विषय पदव्युत्तर पदवी स्तरावर शिकविला जात नसल्यास वरील परिच्छेद क्र. ३ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

५. विद्यापीठ परिपत्रक जा. क्र. आरआर/२१४, दि. ३० जून, २०२३ मधील इतर तरतुदी योग्य त्या फेरफारासह यापुढेही लागू राहतील.

सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रकाचा आशय त्यांनी सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

गणेशखिंड, पुणे - ४११००७ )
जावक क्र. आरआर/ ३०९ )
दिनांक : ६ नोव्हेंबर, २०२३ )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव, शिक्षक मान्यता कक्ष

प्रत :
१. मा. प्र-कुलगुरू, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ
४. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
५. मा. प्राचार्य / संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था
६. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष), प्रस्तुत विद्यापीठ
७. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश व पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
८. सहायक कुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ